# “सामाजिक माध्यमांचा विद्यार्थ्यांवरील परिणाम.”

**कु. सलोनी वि. सोनवणे** (बी. ए. दुसरे वर्ष) अर्थशास्त्र विभाग, कमला कॉलेज, कोल्हापूर

भ्रमणध्वनि: 9404293091 ईमेल: salonisonavane25@gmail.com

---

**गोषवारा :-**

सामाजिक माध्यमांनाच ‘सोशल मीडिया (social Media)’ असे म्हटल्या जाते. आपल्या दैनदीन व्यवहारामध्ये सोशल मिडियाचा वापर करणे ही आधुनिक समाजातील लोकांची नित्याची सवय झालेली आहे. याचा वापर केवळ प्रौढ व्यक्तीच करीत नाहीत तर त्यात युवक आणि किशोर अवस्थेतील मुला-मुलींचा देखील समावेश होतो. त्यात विशेषत्वाने विद्यार्थ्यांचा उल्लेख करावा लागतो. समाजातील एवढा मोठा हिस्सा यामध्ये व्यस्त असल्यामुळे ‘सोशल मिडियाचा’ वापर झपाट्याने वाढत आहे. प्रामुख्याने सोशल मीडिया ही व्यक्तीना सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक तसेच वैयक्तिक समस्या मांडण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून देते. तसेच या साधनाचा वापर करून आपले विचार आणि दृष्टिकोण जगासमोर सहजतेने मांडता येतात. इंटरनेट च्या माध्यमातून सर्व सोशल साइट्स आणि संबधित ॲप्लिकेशन यांच्याशी संपर्क साधता येतो आणि याच्याच मदतीने माहिती उपलब्ध करून घेणे व वापरकर्त्यांना एकमेकाशी संवाद साधता येणे शक्य होते.

सामाजिक माध्यमाच्या वापरामुळे समाजावर व तरुण पिढीवर चांगले आणि वाईट दोन्ही स्वरूपाचे प्रभाव पडल्याचे दिसतात. व्हाटसअप्प, फेसबुक, ट्विटर, यूट्यूब आणि इनस्टाग्राम इ. साधनाच्या माध्यमातून कोणतीही शहनिशा अथवा त्या घटनेची विश्वसनियता न तपासता अतिशय वेगाने माहितीचा भडिमार केला जातो. त्याचा परिणाम म्हणून समाजाच्या चुकीच्या संकल्पना निर्माण होण्यास चालना मिळते आणि ते निकोप समाजाच्या दृष्टीने घातक असल्याचे दिसते. शिवाय हे लक्षात घेण्यासारखे आहे की या साधनांचा वापर करण्यामध्ये किशोरवयीन वापरकर्त्यांचे प्रमाण हे अधिक आहे. त्यामुळे येथे विद्यार्थ्यांवर सामाजिक माध्यमाचा अधिक प्रभाव पडताना दिसतो.

**शोध संज्ञा :** सामाजिक माध्यम, विद्यार्थी, शिक्षण, सामाजिक माध्यमाचा प्रभाव.

**प्रस्तावना :**

सामाजिक माध्यमे ही आधुनिक मानवी जीवनशैलीचा एक महत्वाचा भाग बनलेला आहे. आपल्या भावना व्यक्त करीत असताना प्राधान्याने सामाजिक माध्यमांचाच वापर केल्या जातो. ही साधने प्रत्येकाच्या जीवनाचा महत्वपूर्ण भाग बनलेला आहे आणि लोक त्याचा वापर व्यवसाय, शिक्षण, खरेदी-विक्री आणि संपर्क साधण्याकरिता करताना दिसतात. लोक सामाजिक माध्यमांचा वापर कसा करतात त्यामुळे त्यांचे जीवनमान कसे प्रभावित झाले. लोकांच्या आभासी जगामध्ये ओळखी निर्माण करण्यासाठी एकमेकांशी संपर्क प्रस्तापित करण्याकरिता सामाजिक माध्यमांची मदत होत असते. ही माध्यमे राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक आदि सर्वच महत्वपूर्ण क्षेत्राला स्पर्श करीत असल्याने त्याचा मानवी जीवनावर अधिक घनिष्ट परिणाम पडत असल्याचे जाणवते.

प्रौढ वर्गाबरोबरच विद्यार्थी हे दैनदीन आपल्या व्यवहारात इंस्टाग्राम, यूट्यूब, फेसबुक यासारख्या माध्यमावर खूप जास्त वेळ रील्स आणि व्हिडिओ पाहण्यात व्यतीत करतात. या माध्यमावर भारतात प्रत्येक मिनिटाला यूट्यूब वर २,५०० नवीन व्हिडिओ टाकण्यात येतात. यावरुन आपल्याला माहितीचा अंदाजा येतो. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी शैक्षणिक सोशल नेटवर्किंग साईट ला दररोज भेटी देतात. वर्तमान विद्यार्थी हे मनोरंजन, अभ्यास, माहिती संकलन याकरिता या माध्यमांचा वापर करताना दिसतात. लोक या माध्यमाचा वापर कसा आणि कोणत्या कामासाठी करतात यावरुन त्यांच्या जीवनशैलीवर खूप खोलवर

परिणाम पडत असल्याचे दिसते. या माध्यमाचा वापर हा व्यक्तीच्या आपल्या आवडी-निवडीवर अवलंबून असतो. म्हणूनच काही ठिकाणी त्याचा चांगला परिणाम तर काही वेळा वाईट प्रभाव पडत असल्याचे जाणवते.

सामाजिक माध्यमाच्या अतिरिक्त वापरामुळे विद्यार्थाचे लक्ष हे विचलित होत असल्याचे दिसते. सामाजिक माध्यमाच्या साह्याने दर्शीविण्यात येणाऱ्या दृश्यामध्ये आकर्षित करण्याची क्षमता खूप अधिक असल्याचे दिसते. आपण आभासी विश्वाशी जुळलेलो असल्याची एक भावना असते त्यामुळे विद्यार्थी अभ्यास अथवा इतर कोणतेही कांमकरीत असले तरी अधून-मधून सामाजिक माध्यमांना भेटी देत असतात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या एकाग्रता भंग होण्यात होतो. विद्यार्थी हे शैक्षणिक सामाजिक संकेतस्थळांबरोबरच इतर ही स्थळांना भेटी देतात त्याचा परिणाम म्हणजे अधिक वेळ आभासी विश्वात खर्ची पडतो मात्र त्यातून नेहमी उपयुक्त माहिती मिळेलच असे नाही. एकंदरीत त्यातून विद्यार्थ्यांच्या मनावर नकारात्मक परिणाम होतो.

यातून आरोग्यविषयक समस्या तसेच कुटुंबामध्ये असमंजस निर्माण होतात. सोशल मिडियामुळे विद्यार्थी व नोकरदार वर्ग यांचे आपल्या कार्यावर लक्ष केंद्रित करू शकत नाही, त्यांचे मन विचलित होते. या संशोधन लेखाच्या माध्यमातून सामाजिक माध्यमाच्या वापरामुळे विद्यार्थावर होणाऱ्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**सामाजिक माध्यमे :**

आधुनिक जीवनशैली मध्ये सोशल मीडिया पूर्णपणे रुजलेली आहे. सामाजिक माध्यमे हे एक संगणक पद्धतीवर आधारित तंत्रज्ञान आहे. जे आभासी (virtual) विश्व आणि आपल्या विचाराशी मिळता-जुळता समाजातील लोकांचा एक गट निर्माण करून; आपले विचार आणि स्वनिर्मित सामग्रीची देवाण-घेवाण करण्याची सुविधा प्रधान करते. सामान्यता विद्यार्थी ही आपल्या समवयस्क मूला-मुली कडूनच सामाजिक माध्यमे वापरण्यास प्रवृत्त होत असल्याचे दिसतात. असे असले तरी प्रौढ आणि शिक्षकाकरिता सामाजिक माध्यमे ही माहितीचा प्रचार-प्रसार करण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असल्याचे दिसते.
विद्यार्थ्यांना एकाच जागेवर असतांना जगभरामध्ये मित्र बनविणे सोपे झाले आहे. सामाजिक माध्यमाच्या साधनाद्वारे वापरकर्त्यांना एकमेकांशी संवाद साधता येतो. विचाराची आणि माहितीची देवाण-घेवाण करता येते. तसेच याच्या वापरामुळे घटना, घळामोळी ह्या वाऱ्याच्या वेगाने पसरतात. सोशल मिडियाच्या माध्यमातून त्यांच्या समस्या मांडू शकतात, आणि त्यावर उपाय देखील प्राप्त करू शकतात.

**जगप्रसिद्ध सामाजिक माध्यमे:**

- **फेसबुक (Facebook)** –फेसबुक ही अगदी सुरवातीपासून जगभरामध्ये सर्वात लोकप्रिय असे सामाजिक माध्यम आहे. त्याची सुरवात ही अमेरिकेमध्ये झाली आणि प्रसिद्धी देखील सुरवातीला त्याला त्याठिकाणीच मिळाली. या सामाजिक माध्यमाच्या साह्याने विदहयार्थी विविध प्रकारची माहिती, अभ्यासातील मजकूर, महत्वपूर्ण माहिती ही प्रसिद्ध (post) करतात. सामन्यात: त्यांना आपण प्रसिद्ध केलेल्या माहिती किवा सूचना कोणापर्यंत पोहचायला हवेत हे नियत्रित करता येत असल्याने विशिष्ट समूहाशी, व्यक्तीशी माहितीची देवाण-घेवाण करणे शक्य होते.
- **यूट्यूब (YouTube)** – यूट्यूब ही जगप्रसिद्ध व्हिडिओ सामग्री प्रसिद्ध करणारे सोशल मीडिया माध्यम आहे. विद्यार्थी हे यूट्यूब च्या माध्यमातून शैक्षणिक आणि अन्य व्हिडिओ पाहू शकतात. त्याचबरोबर स्वत: व्हिडिओ तयार करून त्याला प्रसिद्धी देतात. आज संपूर्ण जगामध्ये ३०० दशलक्ष (३०० million) लोक हे यूट्यूब चा वापर करीत असून वापर कर्त्यांची संख्या ही दिवसेंदिवस अधिकच वाढत चाललेली आहे.

- **व्हाटसअॅप (What'sApp)** –व्हाटसअॅपहेअगदी वेगाने लोकप्रियता प्राप्त करणारे सोशल मीडिया माध्यम आहे. व्हॉटसअॅप या माध्यमाचा अधिकतर वापर हा वैयक्तिक अथवा सामूहिक गटामध्ये (chatting च्या माध्यमातून)संदेश पोहचविण्याकरिता करण्यात येतो. संवाद साधण्याकरीत व्हाटसअॅप हे एक सुरक्षित आणि उत्तम साधन मानल्या जाते. यामध्ये केवळ text च्या स्वरूपातच संवाद केल्या जात नाही तर दोन पेक्षा अधिक व्यक्तीशी व्हिडिओ आणि ऑडिओ कॉल एकाच वेळी करणे शक्य होते. विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधने सोपे जाते. जगातील एकूण लोकसंख्या पैकी आज २.५ बिलियन पेक्षा अधिक लोक व्हाटसअॅप चा वापर करीत आहेत.
- **इंस्टाग्राम (Instagram)** –इंस्टाग्राम हे एक जगप्रसिद्ध फोटो शेअरिंग सोशल मीडिया माध्यम आहे. इंस्टाग्राम हे मनोरंजनसोबतच शैक्षणिक माहिती आणि महत्वपूर्ण अभ्यास साहित्य उपलब्ध करून देणारे व्यासपीठ आहे. यामुळे विद्यार्थास ज्ञानर्जन करण्यास मदत होते. इंस्टाग्राम च्या माध्यमातून लोक केवळ मनोरंजनच करीत नाही तर त्याच्या माध्यमातून घरी बसल्या लाखों रुपये कमवितात. २०२१ मध्ये इंस्टाग्रामचे ९०९ मिलियन पेक्षा अधिक वापरकर्ते होते, ज्यांची दिवसेंदिवस संख्या ही अधिक वाढत जात आहे. इंस्टाग्राम ही जगातील चौथी सर्वाधिक वापरले जाणारे सोशल मीडिया साधन आहे.

**सामाजिक माध्यमांचा सकारात्मक प्रभाव-**

- जगातील एक व्यक्ती ही कोणत्याही देशातील व्यक्तीला राहत्या ठिकाणाहून संवाद साधू शकतो, त्याला आभासी दुनियेत पाहू शकतो. त्यामुळे लोकांतील अंतर खूप कमी झाले आहे. केवळ एक बटन दाबायचे आणि कोणत्याही देशातील व्यक्तीशी संवाद साधायचा हे सोशल मिडियामुळे शक्य झालेले आहे.
- सोशल मीडिया हे केवळ संपर्क साधण्याचे किंवा मनोरंजन पुर्ती करण्याइतपच मर्यादित न राहता अनेक लोक घर बसल्या लाखों रुपये कमावत आहेत. सोशल मिडियाच्या माध्यमातून लाखों रुपये कमविण्याचे काही प्रसिद्ध मार्ग आहेत. जसे की इंटरनेट मार्केटिंग, सोशल मीडिया मार्केटिंग आणि पेड प्रमोशन. याठिकाणी काम करण्याकरिता वयोमार्यादा नाही. ज्यामुळे विद्यार्थी शिक्षण घेत असताना पैसे देखील कमाऊ शकतात.
- आज लोक मनोरंजणाकरिता टी. व्हि. एवजी सोशल मीडिया माध्यमांचा वापर करतात. यामध्ये सर्वाधिक फायदा हा व्यापारी वर्गाला दिसून येतो. कारण जी जाहिरात या माध्यमावर प्रसिद्ध केल्या जाते ती अधिक लोकांपर्यंत पोहचते. शिवाय यासाठी लागणारा खर्च टी. व्हि. मध्ये दिल्या जाणाऱ्या जाहिरातीपेक्षा कमी येतो. त्यामुळे कमी भांडवलात व्यावसायिक स्वत:च्या कंपनीचे, उत्पादनाचे अधिक प्रसिद्धी करू शकतात.
- यूट्यूब सारख्या सोशल मीडिया व्यासपीठावर अनेक शैक्षणिक संस्थानी आपले वर्ग उघडलेले आहेत. शिवाय काही शिक्षक आपले वैयक्तिक विषयाचे लेक्चर उपलब्ध करून देतात. जे की चित्र स्वरूपात असतात ज्यामुळे अभ्यासतील कठीण भाग सहजतेने संमजू शकतो. कारण याठिकाणी आपल्या सवळीनुसार एकच लेक्चर परत-परत बघण्याची सुविधा उपलब्ध असते. आपण असे म्हणू शकतो की, सोशल मिडीयामुळे शिक्षण घेणे सोपे झाले आहे.
- जगामध्ये शैक्षणिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातील कोणतीही चांगली अथवा वाईट घटना घडल्यास त्यासंदर्भातील माहिती सामाजिक माध्यमावर सातत्याने प्रदर्शित होऊन वायरल केल्या जाते. ज्यामुळे त्याघटनेविषयीची माहिती तंतोतंत प्राप्त होऊन त्याच्या मुळाशी जाता येते. या माध्यमाच्या उपलब्धतेमुळे आपण एकप्रकारे जगाशी जोडल्या गेलोय.
- सामाजिक मध्यामाची मदत घेऊन विद्यार्थी ही जगातील कोणत्याही शिक्षका कडून कोणत्याही विषयावर ज्ञानर्जन करू शकतात. विद्यार्थ्यांना जानवणाऱ्या अडचणीचे कमी वेळात समाधान प्राप्त करू

शकतात. सामाजिक माध्यमावर अधिक प्रमाण हे कृतिशील युवकांचे असल्याकारणाने ते जरी वेगवेगळ्या शहरातील, प्रांतातील, देशातील असले तरी एकमेकांच्या संपर्कात राहून समजहिताचे निर्णय घेऊ शकतात.

**सामाजिक माध्यमांचा नकारात्मक परिणाम** –

- सतत फक्त मनोरंजणाकरिता सामाजिक माध्यमाचा वापर केल्यास जीवणातील मौल्यवान वेळ वाया जाते आणि एकदा निघून गेलेली वेळ परत येत नाही. त्याचा खूप मोठा संधिखर्च विद्यार्थ्यांना मोजावा लागतो.
- सामाजिक माध्यमाना साधारणत: मोबाईलच्या माध्यमातून हातळल्या जात असते आणि मोबाइल टेक्नॉलजी ही किरणोत्सर्गी (रेडिओअक्टटीव्ह) असल्याचे दिसते. मोबाइल कीव टॅब्लेट यामध्ये रिसिव्हर आणि ट्रान्सलेटर उपलब्ध असतात. ज्यातून नेहमी किरणोत्सग्र होत असतो. आणि हा किरणोत्सग्र मानवी आरोग्याच्या दृष्टीने विशेषत: हृदयाच्या आरोग्याच्या दृष्टीने अधिक घातक असल्याचे वैद्यकीय तज्ञानी संशोधनात मांडले आहे. त्यातून हृदयाच्या आरोग्यावर मोबाईलच्या अतिरिक्त वापरामुळे प्रत्यक्ष हल्ला चढून ते कमजोर होत असल्याचे दिसते. शिवाय कर्करोगाची शक्यता अधिक वाढते.
- सोशल मिडियावर येणारी माहिती ही खरी आहे की नाही यांची पडताळणी न करताच अनेक लोक त्या माहितीचा प्रचार आणि प्रसार करतात. त्यामुळे समाजामध्ये खोट्या महितीच्या अफवा पसरण्याचा अधिक धोका निर्माण होतो. प्रत्येक व्यक्ती ही आपली खाजगी माहिती सामाजिक माध्यमावर प्रसिद्ध करीत आहे. त्यामध्ये आपण कोणत्या ठिकाणी आहोत, कोणा सोबत आहोत, के करीत आहोत इ. मुळे चोरी, अपहरण यासारख्या गुन्ह्यामध्ये वृद्धी होतांना दिसते. सोशल मिडियाच्या सततच्या वापरामुळे डोळयांना त्रास होऊन आरोग्यविषयक समस्यांत वाढ होण्याची शक्यता असते.
- सामाजिक माध्यमे हे सगळयाना मोफत व्यासपीठ उपलब्ध करून देते त्यामुळे या माध्यमावर मोठ्या प्रमाणावर गर्दी निर्माण झालेली आहे आणि त्याचा फायदा काही लोक अनैतिक कामाकरिता करताना दिसतात. या माध्यमावर प्रसिद्ध केलेली माहिती ह गुप्त आणि सुरक्षित असणे गरजेचे असते. मात्र ती जगासमोर उघड झाल्यास खाजगी आयुष्य सामाजिक जीवनावर परीणाम होऊ शकतो. आणि या माध्यमावर आपली माहिती जगासमोर येण्याची नेहमीच भीती असते. अनेकदा अशी माध्यमे हॅकर्स द्वारा हॅक करून आपली माहिती तिसऱ्या व्यक्तीला विकल्या जाते असल्याचे दिसून येते. त्यातून बऱ्याचवेळा ब्लॅकमेलिंग सारख्या घटना घटतात.
- विद्यार्थाच्या हातात सर्रास मोबाईल असल्याचे दिसते त्यांना मोबाइल च्या माध्यमातून सोशल मीडिया हाताळणे सोपे आणि सहज झालेले आहे. त्यामुळे त्यांचा या माध्यमावर गरजेपेक्षा अधिक वेळ जात असल्याचे दिसते. याचा परिणाम असा होतो की, त्यांना सोशल मीडिया द्वारे निर्माण करण्यात आलेले आभासी विश्व हे खरे वाटायला लागते. ते वास्तवतेपासून दूर जाताना दिसतात. शिवाय सामाजिक माध्यमावर अनेक आपत्तीजनक संदेश, व्हिडिओ आणि फोटो असतात यामुळे समाजातील वातावरण दूषित होताना दिसते.
- सामाजिक माध्यमावर शेकडो हजारो खाती ही बनावट असल्याचे दिसतात. यात प्रामुख्याने मुले हे मुलींशी मैत्री करण्याच्या हेतूने मुलीच्या नावाने बनावट खाती बनवीत असल्याचे दिसून येते. मात्र यातून फारसे साध्य न होता यातून या मूला- मुलीमध्ये फसवणूक झाल्याची भावना निर्माण होते आणि त्यातून नैराश्याचे वातावरण तयार होते. विद्यार्थांना सोशल मिडियाच्या अतिरिक्त वापरामुळे प्रत्यक्षात लोकांशी संवाद साधण्यामध्ये सहजता येत नसल्याचे दिसते ते सामाजिक व्यहारात प्रत्यक्षात सहभाग घेण्यास टाळाटाळ करतात आणि पडद्यामागून बोलण्यात अधिक रस दाखवितात.

**निष्कर्ष–**

एकंदरीत वरील प्रमाणे केलेल्या विश्लेषणावरुन सामाजिक माध्यमाचे विद्यार्थ्यांवर वेगवेगळ्या पातळीवर काही सकारात्मक तर काही प्रमाणात नकारात्मक परिणाम होताना दिसतात. मात्र याचे विद्यार्थावरील नकारात्मक परिणाम हे अतिशय घातक असल्याचे दिसतात; त्यामुळे या समस्यावर मात करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानर्जनामध्ये सोशल मिडियाची मदत होत असल्याचे दिसत असले तरी त्यांचे नकारात्मक परिणाम दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे या माध्यमाच्या वापरावर मर्यादा आणण्याकरिता पालकांना आपली महत्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते. सामाजिक माध्यमावर घालविला जाणारा अतिरिक्त वेळ जर नियंत्रणात आणला तर त्याचे होणारे अनेक दुष्परिणाम टाळता येतात.

जर सामाजिक माध्यमाचा उपयोग हा शैक्षणिक साहित्याचीवमाहितीची देवाण-घेवाण करण्यापुरता मर्यादित करण्यात आला तर विद्यार्थ्यांवरील सामाजिक माध्यमाचा नकारात्मक प्रभाव कमी होण्यास मदत मिळेल. पालकांनी आपल्या पाल्यांना समोरासमोर सामाजिक संवादाकरिता प्रोत्साहन द्यायला हवे. जसे की, आपल्या पाल्यांना विशिष्ट कौटुंबिक वेळ द्यायला हवा, त्यांना आरामदायक कोणतेही दडपण न देता त्यांच्या अभ्यासविषयक विचारपूस करणे. किंवा नतेवाईक, मित्र तसेच कुटुंबियाना एकत्रित आणण्याकरिता प्रयत्न करायला हवेत. प्रत्यक्षात आनंदी आणि सामाजिक जाणीव असलेला संवाद प्रदान करायला हवा.

ह्या सर्व बाबी आपल्याला सामाजिक माध्यमाचा विद्यार्थ्यांवर होणार नकारात्मक परिणाम कमी करण्यास उपयुक्त पडत असल्याचे दिसतात. याचा निश्चितच तरुण पिढी आणि विद्यार्थ्यांना फायदा होताना दिसतो.

**संदर्भ सूची –**

1. मिणा, वी. कु. आणि मोहम्मद, स. (२०१३), “रोल ऑफ सोशल मीडिया इंन एज्युकेशन.”इंटरनॅशनल जनरल ऑफ क्रिएटिव रिसर्च थॉट्स, खंड १, अंक ISSN: 2320-2882
https://www.researchgate.net/publication/353958127_Role_of_Social_Media_in_Education

2. सुतार, प्र. (जून २०१५), सोशल मीडिया डिजिटल दुनिया, मल्टीव्हर्सिटी प्रकाशन, पुणे. पृष्ट क्र. १५ ते ३५.

3. फारूक, एम. एम. जे. (२०१५) “ॲन ॲनलिसिस ऑफ वीवस ऑफ स्टुडेंट, टीचर्स अँड इंडस्ट्री एम्पलॉय ऑन यूज ऑफ सोशल नेटवर्किंग साइट्स इन एज्युकेशन.” ग्लोबल जनरल ऑन टेक्नॉलॉजी, अंक ९

4. मोहम्मद, आ. आणि फारूक, एम, एम, जे, (२०१९), “यूज ऑफ सोशल नेटवर्किंग साईट इन ॲकडमिक : अ रिव्यू.” कम्प्युटर रिव्यू जनरल. अंक ५, ISSN 2581- 6640.
https://www.researchgate.net/publication/338549157_Use_of_Social_Networking_Sites_in_Academics_A_Review

5. मराठी वारसा टीम, (२०२१, सप्टेंबर ३०) https://marathivarsa.com/education/information-about-social-media-in-marathi/

6. मराठी वर्ल्ड, (२०२२)https://marathiword.com/social-media-information-in-marathi/

7. देसाई, सी. (फेब्रूवारी २०२२).इमपक्ट ऑफ सोशल मीडिया ऑन एज्युकेशन, डिजीटीलायझेशन: इमपक्ट ऑन इंडियन सोसायटी.
https://www.researchgate.net/publication/358850252_Impact_of_social_media_on_education